**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शनिवार दिनांक ११ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **कार्बन उत्सर्जन शून्य करणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर नागपूरच्या ब्रिक्स परिषदेत प्रतिनिधींनी केली चर्चा.**
2. **देशातील सर्वात मोठे इंटरनॅशनल ॲग्रिकल्चरल कन्व्हेंशन अँड एक्झिबिशन सेंटर नागपुरातील दाभा परिसरात साकारणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली कामाची पाहणी.**
3. **‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने’अंतर्गत बोधगया रेल्वे गाडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवी झेंडी दाखवून केले रवाना.**
4. **ॲक्युपंक्चर उपचार शिक्षणाच्या विस्तारासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन.**

---------------------------------------

**ब्रिक्स**

भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्याच्या परिषदेला आज नागपूरच्या हॉटेल रेडिसन ब्लू इथं सुरूवात झाली. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं.पर्यायी जैव-इंधने आणि प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानाचा अवलंब करून रस्ते, रेल्वे, हवाई आणि जलवाहतूक क्षेत्रात कार्बन उत्सर्जन शून्य करणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर प्रतिनिधींनी चर्चा केली, अशी माहिती गडकरी यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली.

***(होल्ड बाईट - २४ गडकरी)***

लवचिक आणि शाश्वत परिवहन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी ब्रिक्स सदस्य देशांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची देवाणघेवाण केली जात आहे; तसेच, या सहकार्याला बळकटी देण्यासाठी या बैठकीत 'ब्रिक्स मंत्रीस्तरीय घोषणापत्र २०२६' देखील स्वीकारण्यात आलं आहे, असंही गडकरी यांनी सांगितलं.

---------------------------------------

**ॲग्रिकल्चरल कन्व्हेंशन सेंटर**

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे देशातील सर्वात मोठे इंटरनॅशनल ॲग्रिकल्चरल कन्व्हेंशन अँड एक्झिबिशन सेंटर नागपुरातील दाभा परिसरात उभारले जात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या कामाची पाहणी करून कामाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. कृषी प्रदर्शनाशिवाय अन्य प्रदर्शने, परिषदा याकरिता कन्व्हेंशन व्हेन्यू म्हणून हे सेंटर जगभर ख्यात होईल आणि नागपूर शहराला एक वेगळी ओळख त्यामुळे मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

***(होल्ड बाईट -मुख्यमंत्री 35 सेकंद)***

दाभा गावालगत पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या २१.७ हेक्टर जागेत राज्य सरकारतर्फे हे सेंटर उभारले जात असून 2 हजार आसन क्षमतेचे ऑडिटोरियम हे येथील आणखी एक वैशिष्ट्य आहे. येथील सभागृह आकारमानाने देशातील सर्वात मोठे सभागृह असणार आहे.

---------------------------------------

**भूमिपूजन-मुख्यमंत्री**

नागपूर महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी मौजा-नारी येथे उभारण्यात येणाऱ्या 'महर्षी सुदर्शन वाल्मिकी वसाहत' तसेच प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत 'स्वप्नपूर्ती' ईडब्ल्यूएस सदनिका प्रकल्पाचे भूमिपूजन उद्या रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महापौर नीता ठाकरे भूषविणार आहेत. राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

---------------------------------------

**चंद्रशेखर बावनकुळे**

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम १५५ चा गैरवापर करून जमिनींच्या नोंदींमध्ये बेकायदेशीर बदल करणाऱ्या महसूल विभागातील दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर केवळ निलंबन नव्हे तर फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येतील, असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. चौकशी समितीच्या अहवालात गंभीर गैरव्यवहार उघड झाल्याचे त्यांनी सांगितले. २२ जुलैपासून राज्यभर विशेष महसूल शिबिरे घेऊन सेवा हमी कायद्यांतर्गत दहा लाख कुटुंबांना महसुली

सेवा देण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी जाहीर केले. बोगस बियाणे प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून बाधित शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

--------------------------------------

**विशेष बस सेवा**

राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे पर्यटकांसाठी येत्या १२ जुलैपासून अर्थात उद्यापासून दर रविवारी 'अमरावती ते चिखलदरा दर्शन' विशेष बस सेवा सुरू करण्यात येणार आहे. आधुनिक बीएस प्रकारातील नवीन 'लालपरी' बसमधून प्रवाशांना गार्डन, देवी, किल्ला, लेक, पंचबोल आणि भीमकुंड पॉईंटसह प्रमुख पर्यटनस्थळांचे दर्शन घडविण्यात येणार आहे. बस अमरावतीहून सकाळी ८ वाजता सुटून सायंकाळी ५ वाजता चिखलदऱ्यावरून परतीच्या प्रवासाला निघेल. अधिक माहितीसाठी व आरक्षणासाठी प्रवाशांनी संबंधित आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधण्याचे आवाहन एसटी प्रशासनाने केले आहे.

--------------------------------------

**तरुणांची चौकशी**

पाकिस्तानमधील कुख्यात गँगस्टर शहजाद भट्टी सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय बेरोजगार तरुणांना पैशांचे आमिष दाखवत देशविरोधी कारवायांकडे वळविण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती समोर आल्यानंतर चंद्रपूर पोलिस आणि दहशतवादविरोधी पथक सतर्क झाले आहे. या पार्श्वभूमीवर दुर्गापूर येथील एक आणि घुग्घुस येथील दोन अशा तीन संशयित तरुणांची चौकशी करण्यात आली. चौकशीत त्यांच्या देशविघातक कारवायांतील थेट सहभागाचे कोणतेही पुरावे आढळून न आल्याने त्यांना सोडून देण्यात आले. मात्र, त्यांच्या हालचालींवर पोलिसांचे लक्ष असून सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना जाळ्यात ओढण्याच्या प्रयत्नांबाबत सुरक्षा यंत्रणांनी सतर्कता वाढविली आहे.

--------------------------------------

**विशेष रेल्वे**

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत बिहारमधील महाबोधी विहार, बोधगया येथे जाणाऱ्या विशेष रेल्वेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर रेल्वे स्थानकावरून हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. यावेळी बोलताना बोधगया ही गौतम बुद्ध यांच्या विचारांची प्रेरणाभूमी असल्याचे त्यांनी सांगितले. या यात्रेत नागपूरसह इतर जिल्ह्यांतील ८०० ज्येष्ठ लाभार्थी ११ ते १६ जुलैदरम्यान विशेष रेल्वेने

तीर्थदर्शनासाठी रवाना झाले आहेत. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेद्वारे ६० वर्षे व त्यावरील सर्व धर्मांतील ज्येष्ठ नागरिकांना मोफत तीर्थदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. कार्यक्रमाला मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, खासदार श्यामकुमार बर्वे, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद उपस्थित होते. फुगे आणि फुलांनी सजविलेल्या विशेष रेल्वेचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

---------------------------------------

**वृक्षारोपण**

महाराष्ट्र शासनाच्या 'व्हिजन ३०० कोटी वृक्षारोपण' आणि 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वृक्षारोपण केले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अपर जिल्हाधिकारी राजेंद्रकुमार जाधव, डीन डॉ. सुजाता दुधगावकर, सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. हरित व पर्यावरणपूरक भंडारा घडविण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

---------------------------------------

**खरीप हंगाम**

राज्यात मान्सूनने जोर धरल्याने खरीप हंगामातल्या पेरणीच्या कामांना वेग आला आहे. कृषी आयुक्तालयाच्या ७ जुलैच्या अहवालानुसार, राज्यातल्या ६५ लाख ११ हजार ८७२ हेक्टर, म्हणजेच ४५ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. ऊसाची लागवड लक्षात घेतली तर एकूण ६५ लाख ८२ हजार ६२३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी आणि लागवड झाली आहे. अमरावती विभागात सर्वाधिक ५८ टक्के पेरणी झाली असून, त्यापाठोपाठ छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागात प्रत्येकी ५० टक्के, लातूर विभागात ४४ टक्के, नागपूर विभागात ३९ टक्के, पुणे विभागात २२ टक्के, कोल्हापूर विभागात १५ टक्के, तर कोकण विभागात केवळ ४ टक्के पेरणी झाली आहे. उशिरा सुरू झालेल्या पावसामुळे कोकणात पेरणीला विलंब झाला असला, तरी अलीकडे झालेल्या पावसामुळे आता या कामांना गती मिळत आहे. तेलबियांची ६० टक्के, कापसाची ४९ टक्के, कडधान्यांची ३७ टक्के आणि तृणधान्यांची ३० टक्के

पेरणी झाली आहे. कापूस आणि सोयाबीन ही पिके सर्वाधिक क्षेत्रावर असून, भात, नाचणी, मका, तूर, मूग आणि उडीद पिकांच्या पेरणीलाही वेग आला आहे. पेरणी झालेली बहुतांश पिके उगवण ते रोपवाढीच्या अवस्थेत असून, काही भागांत भाताची पुनर्लागवड सुरू आहे. गेल्या आठवड्यात राज्यभर झालेल्या पावसामुळे रखडलेल्या पेरण्यांना चालना मिळाली असून, पुढील काही दिवसांत पेरणीचे प्रमाण आणखी वाढण्याची अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

---------------------------------------

**ॲक्यूकॉन-२०२६**

ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीच्या विस्तारासाठी व शैक्षणिक मान्यतेसाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित ॲक्यूकॉन-२०२६ राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. स्वतःला पाठदुखीच्या त्रासातून ॲक्युपंक्चरमुळे आराम मिळाल्याचा अनुभव सांगत त्यांनी या उपचार पद्धतीच्या प्रभावीपणावर विश्वास व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ ॲक्युपंक्चरचे डॉ.रूमी बेरामजी यांनी राज्यात ४,५०० हून अधिक नोंदणीकृत ॲक्युपंक्चर तज्ज्ञ कार्यरत असून त्यापैकी ६० टक्के महिला असल्याची माहिती दिली.

---------------------------------------

**हवामान**

हवामान! आज आणि उद्या विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता नसल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. परवा 13 तारखेला गोंदिया चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहू शकत. दरम्यान, पावसाने उघडीप दिल्याने हवामानात उकाडा वाढला आहे.

---------------------------------------

**पावसाची उघडीप**

पावसाने उघडीप दिल्यामुळे अकोला जिल्ह्यात शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली आहे. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने पिकांच्या उगवणीसह वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

---------------------------------------